जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUN 2021
पुढारी

# ज्येष्ठ नागरिकांसाठी योग मार्गदर्शन व्याख्यान

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी ऑनलाईन स्वरूपात योग मार्गदर्शन व्याख्यान झाले. योग प्रशिक्षक श्वेतलीना पाटील यांनी 'आनंददायी जीवनासाठी योग' या विषयावर मार्गदर्शन केले. वेगवेगळ्या योग प्रकारांचे प्रात्यक्षिक सादर करून माहिती दिली. डॉ. ए. एम. गुरव यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. अतुल एतावडेकर यांनी आभार मानले. ऑनलाईन व्याख्यानात ४९ जण सहभागी झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUN 2021
सकाळ

# तुकारामांची गाथा सवलतीच्या दरात

उजळाईवाडी, ता. २१ : शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनातर्फे मारुती भाऊसाहेब जाधव (तळाशीकर गुरुजी) यांच्या तुकारामबाबांच्या गाथेचे निरुपण (भाग एक व दोन) सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले आहे. मूळ किंमत १३०० रुपये असून, सवलतीच्या दरात ही गाथा ८७० रुपयांना मिळेल. विद्यापीठ प्रकाशने विक्री केंद्र, शिवाजी विद्यापीठ कन्झ्युमर स्टोअर्स, ॲनेक्स इमारत, मुख्य इमारतीच्या मागे ही गाथा उपलब्ध असेल.

22 JUN 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात मियावाकी जंगल निर्मितीस सुरुवात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जल संवर्धनाच्या कामाबरोबरच आता शिवाजी विद्यापीठाने गर्द वनराईची निर्मिती हाती घेऊन जैवविविधता विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठ परिसरात मियावाकी जंगल (दाट वनराई) निर्मितीच्या अभिनव उपक्रमास कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ परिसरातील जैवविविधता विकासासाठीचे हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मतही कुलगुरूंनी यावेळी व्यक्त केले. मियावाकी जंगल ही दाट वृक्षारोपणाची मूळ जपानी संकल्पना असून त्याअंतर्गत विविध प्रकारच्या प्रजातींची गर्द, दाट वनराई होईल, अशा प्रकारे लागवड करण्यात येते.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलाच्या शेजारील परिसरामध्ये मियावाकी जंगल लागवडीस कुलगुरूंच्या हस्ते जांभूळ रोप लावून प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बहावा आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते कांचन रोपे लावण्यात आली. साडेसात गुंठ्यांच्या परिसरात बहावा, कांचन, जांभूळ, चिंच, विलायती चिंच, फणस, जास्वंद, अडुळसा, रातराणी, तगर, चाफा, धावडा आणि बांबू अशा तेरा प्रजातींच्या एकूण ९५८ रोपांची लागवड करण्यात आली.

विद्यापीठाच्या परिसरात दहा विविध ठिकाणी मियावाकी जंगलांची निर्मिती करण्याचा मानस आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी याप्रसंगी दिली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गर्द वनराईच्या लागवडप्रसंगी वृक्षारोपण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

22 JUN 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात योग दिन विविध उपक्रमांनी उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जिल्ह्यात सोमवारी ७ वा आंतरराष्ट्रीय योग दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, संघटना, पक्ष यांच्याकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कोरोनामुळे यंदा दुसऱ्या वर्षी ऑनलाईन पद्धतीने कार्यक्रम पार पडले. अनेक नामांकित योग प्रशिक्षकांनी योगाचे धडे दिले, त्याचबरोबर योगाचे महत्त्व पटवून सांगितले.

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह सुमारे १ हजार १०० जणांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शविली आणि योग सराव केला. योग प्रशिक्षक सूरज पाटील यांनी विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' यूट्यूब वाहिनीवरून योगसाधकांना एक तास योग प्रात्यक्षिके दाखविली. प्रात्यक्षिकांमध्ये सर्व सहभागींचे कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान, योग प्रशिक्षक श्वेतलीना पाटील यांनी 'आनंददायी जीवनासाठी योग' या विषयावर मार्गदर्शन केले; तसेच वेगवेगळ्या योग प्रकारांचे प्रात्यक्षिक सादर करून माहिती दिली. डॉ. ए. एम. गुरव यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. अतुल ऐतवडेकर यांनी आभार मानले.

## भाजप जयसिंगपूर मंडलामार्फत

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

जयसिंगपूर भाजपा मंडलामार्फत येथील रोटरी हॉल व येसूवहिनी सावरकर बालमंदिर, सुदर्शन चौकात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंडल अध्यक्ष रमेश यळगूडकर यांनी स्वागत केले. योग शिक्षक दीपक अणेगिरीकर व स्वरूप सूर्यवंशी यांनी उपस्थितांकडून योगासने करून घेतली. यावेळी नगराध्यक्षा डॉ. नीता माने, माजी मंडल अध्यक्ष मिलिंद भिडे, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस संतोष जाधव, विनायक अणेगिरीकर, कुलदीप देशपांडे, कुमार हतळगे, युवा मोर्चा मंडल अध्यक्ष पंकज गुरव, रोहित बागडी, योगेश अंधारे, योगेश देशपांडे, संजय चौगुले, विनय पाटील आदी उपस्थित होते.

## विवेकानंद महाविद्यालय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयात ७ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगा प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. 'योगा फोर वेल बीईंग' मथळ्याखाली योग दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी योग शिबिराचे उद्घाटन केले. प्रमुख अतिथी मेजर गुगा मालती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग साधक प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर आणि योगगुरू आशा पाटील यांनी एनसीसी छात्रांना व एनएसएस स्वयंसेवकांना योगासनाचे धडे दिले. प्रास्ताविक तेजश्री सागावकर आणि आभार सिद्धार्थ पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. राजश्री पाटील, प्रा. डी. एम. पन्हाळकर आणि आर्या जोशी यांनी केले.

## योग साधना संस्था

**कागल : प्रतिनिधी**

येथील श्री शाहू सांस्कृतिक सभागृहात योग साधना संस्था कागल यांच्या सर्व साधकांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी योगगुरू प्रमोद पाटील यांचे योग विषयावर प्रबोधन झाले. स्वागत मार्गदर्शक पांडुरंग काळवर व आभार संस्थेचे अध्यक्ष विष्णू खाडे यांनी मानले. कार्यक्रमास रघुनाथ पुंडे, आनंदराव मोरबाळे, विजयराव कदम, डॉ. राहुल तोरगलकर, प्रल्हाद गायकवाड, बाळासाहेब माळी, श्रीकांत कोरवी, सुजित पवार आदी उपस्थित होते.

## फिनिक्स फाऊंडेशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विचारे माळ येथील फिनिक्स फाऊंडेशनतर्फे जागतिक योग दिनानिमित्त शालेय मुलांसाठी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात ५ ते १४ वयोगटातील ४० मुले सहभागी झाली होती. फाऊंडेशनतर्फे गेली ५ वर्षे शालेय मुलांसाठी योग शिबिर आयोजित केले जात आहे. शिबिरासाठी क्रीडा व योग शिक्षक शमुवेल सौंदडे व योग शिक्षिका रिना सौंदडे यांनी मार्गदर्शन केले.